वाचा:- १) शासन निर्णय क्रमांक सा.प्र.वि.एसआरव्हि /१०९५/प्र.क्र.१/९५/१२,दि.०८.०६.९५
२) शासन निर्णय आकृवि-१२९८/प्र.क्र.६१/१५-ए,दि.२९.०५.९८
३) वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक वेतन ११९९/प्र.क्र२/९९/सेवा-३,दि.२०.७.०१
४) शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक वेतन/२००२/प्र.क्र.१/सेवा-३,दि.११.१.२००२
५) कृषि व पदुम विभाग पत्र क्र.आकृवि/१२०२/प्र.क्र.४७१/१५-ए,मंत्रालय,मुंबई-३२, दिनांक २ जुलै २००२.
६) वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक वेतन-११०९/प्र.क्र.४४/सेवा-३,दि.०१/०४/२०१०.
७) सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्र.बीसीसी-२०१२/प्र.क्र.३३२/१२/१६-ब, दि.१८ मे १३.
८) सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक वशिअ-१२१४/प्र.क्र२६/११/दि.०२.६.१४

**: आदेश :**

उपरोक्त शासन निर्णयाव्दारे राज्य शासकीय कर्मचा-यांना सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू करणेबाबतच्या योजनेअंतर्गत महाराष्ट्र कृषि सेवा गट - ब (क) या संवर्गातील अधिका-यांना वेतन **बँड रुपये-९३००-३४८०० ग्रेड पे रु.४६००** या विद्यमान वेतनश्रेणीत काम करीत असलेल्या व आश्वासित प्रगती योजनेच्या पहिल्या लाभापासून सेवेची नियमीत बारा वर्षे पूर्ण करणा-या खालील अधिका-यांना पदोन्नती साखळीतील महाराष्ट्र कृषि सेवा गट - अ या पदोन्नतीच्या पदाची **वेतन बँड रुपये १५६००-३९१०० ग्रेड पे रु.५४००** ही वरिष्ठ वेतनश्रेणी रकाना क्रमांक-५ मध्ये दर्शविलेल्या दिनांका पासून मंजूर करण्यात येत आहे.

| अ. क्र | अधिकाऱ्याचे नाव (सर्वश्री/श्रीमती) | विभाग | सध्याचे कार्यालय | वरिष्ठ वेतन श्रेणी देय दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | मधुसुदन ए. खोटे | लातूर | ताकृअ सोनपेठ, जि. परभणी | १-८-१३ |
| २ | दिलीप आर. शेंडे | कृ.आ. | सांख्यिकी विभाग, कृ.आ. पुणे-१ | १-८-१३ |
| ३ | विजय डी. पंडित | पुणे | तं.अ. उविकृअ श्रीरामपूर, अहमदनगर | १-८-१३ |

उपरोक्त कर्मचा-यांना देण्यात आलेली साखळी पदोन्नतीची वेतन श्रेणी खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून देण्यात येत आहे.

१. सदरहू वेतन श्रेणी वरील रकाना क्रमांक-५ मध्ये दर्शविण्यात आलेल्या देय दिनांकापासून अमंलात येईल.

२. सदरहू पदोन्नतीमुळे जबाबदारी आणि कर्तव्ये यात वाढ होत नसली तरी नियमीत पदोन्नती प्रमाणे वेतन निश्चितीत लाभ देण्यात येत आहे. मात्र वेतन निश्चितीत मिळालेला हा लाभ त्या श्रेणीत कार्यात्मक पदोन्नती मिळाल्यावर पुन्हा देय होणार नाही.

३. जर एखाद्यास विशेष वेतन मिळत असेल तर या योजनेखाली पदोन्नतीनंतर त्यास मुळ वेतन श्रेणीतील विशेष वेतन अनुज्ञेय राहणार नाही.

४. या योजने अंतर्गत पदोन्नती मिळाली तरी कर्मचा-याचे नांव कनिष्ठ संवर्गाच्या ज्येष्ठता सूचीतच राहील.

५. या आदेशाने देण्यात आलेली साखळी पदोन्नती ही फक्त आर्थिक लाभापुरतीच मर्यादित असून नियमीत पदोन्नतीच्या पदावर हक्क सांगता येणार नाही.

६. उपरोक्त कर्मचा-यांची वेतन निश्चिती करताना शासन निर्णय क्रमांक सा.प्र.वि.एसआरव्हि/१०९५/प्र.क्र.१/९५/१२,दि.८.६.९५ मध्ये उल्लेख केल्याप्रमाणे बंधपत्र लिहून देणे सक्तीचे आहे. त्याप्रमाणे संबधितांकडून बंधपत्र प्राप्त करुन घेऊन एक प्रत सेवापुस्तकात चिटकवावी व एक प्रत या कार्यालयास सादर करावी.

७. भविष्यात कार्यात्मक पदोन्नती मिळाल्यानंतर व ती नाकारल्यास संबधिताकडून सुधारीत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ काढून घेण्यात येईल.

८. या योजनेखाली पहिला/ दुसरा अथवा दोन्ही लाभ मंजूर केल्यानंतर प्रत्यक्ष पदोन्नतीस अपात्र ठरलेल्या तसेच प्रत्यक्ष पदोन्नती नाकारलेल्या कर्मचा-यांना देण्यात आलेले लाभ काढून घेण्यात येतील, अशा लाभांची वसुली करण्यात येईल. सदर वसुलीची संपूर्ण जबाबदारी संबंधित आस्थापना अधिका-यांची राहील.

९. वरील कारणाने या योजनेखाली देण्यात आलेले लाभ काढून घेतल्यास संबंधित कर्मचा-यांची वेतन निश्चिती जणू काही या योजनेचे लाभ दिलेले नव्हते असे समजून महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ मधील नियम १२ च्या तरतुदी नुसार करण्यात येईल.

१०. ज्या अधिका-यांचे विरुध्द विभागीय चौकशीची कार्यवाही सुरु असेल अशांचे बाबतीत शा.नि.साप्रवि क्र.एसआरव्हि १०९५/प्र.क्र-२९/९५/१२ दि.२२.४.९६ च्या निर्णयाचे अधिन राहुन कार्यवाही करण्यांत यावी.

११. वरील आदेशातील कर्मचा-यांच्या सेवाविषयक बाबींची (विलेप,प्रथम लाभ देय दिनांक ई.) त्यांच्या मुळ सेवा पुस्तकावरुन पडताळणी करुनच पुढील वेतननिश्चिती करावी.

१२. शासनाचे पत्र क्र.आकृवि-१२००/प्र.क्र.२८७/१५-अं,दि.८.१२.२००० अन्वये प्राप्त सुचनानुसार विभागीय लेखा परिक्षा विहीत मुदतीत उत्तीर्ण न होणा-या अधिका-यांनी प्रत्यक्ष उत्तीर्ण झालेल्या दिनांकापासून सेवाज्येष्ठता निर्धारित करण्याचे शासनाचे फेरनिर्णयाचे अधीन राहून या योजनेचा लाभ देण्यात येत आहे.

१३. मागासवर्गीय कर्मचा-यांचे बाबतीत त्यांनी वैधता प्रमाणपत्र सादर केल्याबाबत खात्री केल्यानंतरच या योजनेचे लाभ त्यांना अनुज्ञेय करण्यात यावेत.

१४. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शा. नि. क्र. वशिअ-१२१४/प्र.क्र.२६/११ दि. ०२.०६.१४ मधील बाब क्र. ४ (अ) मध्ये नमूद करण्यात आल्या नुसार त्या त्या वर्षाची मालमत्ता विवरणपत्रे सादर करणे आवश्यक आहे.

१५. वरील निकष जे कर्मचारी पूर्ण करीत नाहीत त्यांची वेतननिश्चिती न करता याबाबतचा सविस्तर अहवाल आस्थापना विभागास सादर करावा. व वरील सर्व बाबींची पूर्तता होत नसतांनाही त्यांनी वरिष्ठ वेतनश्रेणीत वेतन निश्चित केल्याचे निदर्शनास आले तर संबंधितास जबाबदार धरण्यात येईल.

स्वाक्षरित/-
आयुक्त कृषि
महाराष्ट्र राज्य,पुणे-१.

**पुणे** - ४११००१
**दिनांक** :३०/०९/२०१५.

ooooo

**जा.क्र.कृआआ/काबप/गट-ब(क)/१३५८/आस्था-६(कक)/२०१५,**
**कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य पुणे -४११ ००१,**
**दिनांक :३०/०९/२०१५.**

**प्रत,**

१) मा.विभागीय कृषि सहसंचालक (सर्व)
२) मा.जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी (सर्व)
३) कोषागार अधिकारी, पुणे १.
४) मा.वरिष्ठ प्रशासन अधिकारी,आस्थापना-१ / २
५) प्रशासन अधिकारी आस्थापना-३/४/५
६) कार्यासन अधिकारी,आस्थापना-५ (गोपनीय)
७) सहाय्यक संचालक,लेखा-१ (वेतन व भत्ते)
८) संबधित अधिकारी (सर्व)
९) अभिलेख अधिकारी, यांना **http://www.mahaagri.gov.in** या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेसाठी.

टिपः सदर आदेशाची प्रत http://www.mahaagri.gov.in/level3disp.aspx?id=29&subid=6 या लिंकवर प्राप्त होईल.

**कृषि उपसंचालक,**
**कर्मचारी कल्याण कक्ष,**
**कृषि आयुक्तालय,म.रा.,पुणे-१.**



c:\docume~1\gondhali\locals~1\temp\rar$di00.531\119___101_letters.doc73